कार्यकर्ता : सामाजिक प्रश्न पुरस्कार

मनोगत । हरीश सदानी

# सशक्त समाजनिर्मितीसाठी माझी धडपड



जेंडर बेसड् व्हायोलन्स आणि महिलांच्या शोषणाविरोधात 'मावा' (मेन अगेन्स्ट व्हायोलन्स अँड अॅब्यूज) या १९९३ साली स्थापन झालेल्या संस्थेचे संस्थापक. आजपर्यंत अत्यंत प्रभावीपणे कार्य. मावाच्या 'युवा मैत्री' या अत्यंत आगळ्या व प्रभावी प्रकल्पामधून सध्या कार्यरत. भित्तिपत्रके, गटचर्चा, संवाद, खेळ, पथनाट्य; अशा माध्यमांच्या वापरातून महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांमधील युवकांमध्ये 'जेंडर' विषय अभिनव पद्धतीने शिकविण्याचा प्रयत्न केला जातो आहे. पॉप्युलेशन कौन्सिल, दिल्ली; या संस्थेची सन २००६-२००८ या काळासाठी अत्यंत प्रतिष्ठेची 'हेल्थ अँड पॉप्युलेशन इनोव्हेशन फेलोशिप' त्यांना मिळाली होती. जेंडर आणि सेक्शुअॅलिटी संदर्भातील अभिनव संकल्पना त्यांनी या फेलोशिपमधून 'भाषांतरित' केल्या आहेत.

स्त्री सक्षमीकरण व स्त्रीपुरुष समतेसाठी पुरुषांच्या सहभागाविषयी महत्त्वाच्या पण दुर्लक्षित असलेल्या मुद्द्यांवर गेली दोन दशकं मी ध्येयवादाने, जिद्दीने व चिकाटीने करीत असलेल्या कामाची दखल महाराष्ट्र फाउंडेशनकडून घेतली जात आहे, याचा आनंद आहेच. त्याचबरोबर सिंधी कुटुंबात जन्मलेल्या आणि मराठी मनातील व मराठी मातीतील एक होऊन गेलेल्या एका महाराष्ट्रीयाचा सन्मान सातासमुद्रापलीकडील मराठी बांधवांनी करावा, याचा दुहेरी आनंद काही वेगळाच आहे.

फाळणीनंतर भारतात निघून आलेल्या, मध्यमवर्गीय सिंधी कुटुंबातल्या एका कामगाराचा मी मुलगा. जेथे रहिवाशांना एकमेकांचं जगणं जवळून अनुभवता येतं, अशा मुंबईतील एका चाळीत मी जन्मलो व लहानाचा मोठा झालो. लहानपणापासून लिंगाधिष्ठित अत्याचाराच्या घटना अवतीभवती, अगदी माझ्या कुटुंबातही मी पाहात आलो. बायकांच्या (विशेषत: 'आत्यां'च्या) सहवासात मी वाढत असताना व घरकाम नि:संकोचपणे करत असताना आजूबाजूची मुलं, पुरुष 'बायल्या, छक्का' म्हणून माझी संभावना करू लागत तेव्हा ती संबोधनं माझ्यावर कमी, पण स्त्रियांच्या स्थानाविषयी, पुरुषी दृष्टिकोनावर अधिक भाष्य करणारी आहेत असं मी मानत असे. माझ्या वाढत्या वयात मला गरिबीचा व माझा वेगळा, मितभाषी स्वभाव असण्याचा खूप त्रास झालेला आहे. तरीही ह्या ठराविक ठशाच्या सांस्कृतिक वातावरणाला आक्षेप घेणाऱ्या व्यक्ती मला प्रेरित करत होत्या. हीच माणसं बंदिस्त मूल्यव्यवस्थेला पर्याय आहेत हे मला जाणवू लागलं व अशांशी संवाद साधणं मला सोपं वाटलं.

माझ्या आजवरच्या आयुष्यावर स्त्रियांचा खूप प्रभाव पडला आहे. माझ्या कर्तबगार आत्यांनी मला वाढवण्यासाठी कष्ट घेतले व माझ्या आयुष्याला आकार दिला. कुटुंबात त्यांनी स्वीकारलेल्या भूमिका पाहूनच कुटुंबाबाहेरच्या भूमिकांना प्रश्न करणं मला शक्य झालं. स्त्रियांच्या गरजा व प्रश्नांविषयी संवेदनशील असलेल्या माझ्या वडिलांविषयीच्या पुरुषार्थाच्या प्रतिमा या घराबाहेरील इतर पुरुष-प्रतिमांच्या पूर्णत: विरोधी होत्या. मला घडवण्यात हे सर्व घटक कारणीभूत होते.

आणखी एका व्यक्तीची माझ्या विचारांवर छाप पडली आहे. ती व्यक्ती म्हणजे सिनेअभिनेत्री स्मिता पाटील. कर्तृत्ववान स्त्रीच्या भूमिका रंगवताना तिने ठराविक ठशाच्या दुर्बल स्त्रीची मोडीत काढलेली प्रतिमा माझ्या कार्यात सतत प्रेरक ठरली. तिच्याशी पत्रमैत्री झाली. त्या काळी तिचे सिनेमे पाहून मी अनेकदा उत्स्फूर्तपणे प्रतिक्रिया लिहून मला अस्वस्थ करणारे प्रश्न मांडायचो. एकदा तिने मला 'फिल्म-शूटिंगहून दमून घरी आल्यावर सगळ्या चाहत्यांनी पाठविलेल्या पत्रांपैकी तुझ्या पत्रांना विचारपूर्वकच उत्तरं लिहायला बसावं लागतं' हे कळविल्यावर माझ्या मित्र-मैत्रिणींना झालेली ईर्ष्या आजही आठवते!

टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत समाजकार्याचे (MSW) पदव्युत्तर शिक्षण घेत असताना एका नामांकित स्त्रीसंघटनेत स्वयंसेवक म्हणून मी काम करायचो. वैवाहिक कलहाचे प्रश्न सोडविण्यासाठी संपर्क साधणाऱ्या गरजू स्त्रियांना समुपदेशन करत असताना काही प्रकरणांमध्ये संबंधित हिंसक पुरुषाला संस्थेने बहिष्कृत करण्याच्या कृतीने मी अधिक अस्वस्थ झालो. पुरुषांसोबत नातेसंबंध, लैंगिकता, हिंसा यांविषयी ठोस काम न करता, त्यांना परिवर्तनाच्या प्रक्रियेपासून दूर ठेवून साचेबद्ध पुरुषी प्रतिमा अधिक ठळक करण्यात आपण हातभारच लावत असतो, हे मला स्वानुभवाने उमजू लागले. स्त्रियांवर हिंसा न करणाऱ्या, स्त्रीच्या शरीर-मन-मताची कदर करणाऱ्या पुरुषांची स्त्रियांवरील हिंसा-गैरवर्तन थांबविण्यासाठी काही भूमिका असू शकते का, हा प्रश्न सतत भेडसावू लागला.

आणि अशातच मी सप्टेंबर १९९१ मध्ये एका वृत्तपत्रात पुरुषांना केलेले आवाहन वाचले. माझ्याव्यतिरिक्त २०४ पुरुषांनी त्या आवाहनास प्रतिसाद दिला होता. त्यात पुढाकार घेऊन मी 'मेन् अगेन्स्ट व्हायलन्स ॲन्ड अब्यूज' (मावा) संस्था स्थापन केली.

गेली १७ वर्षे स्त्रीपुरुष नातेसंबंध, लैंगिकता, पुरुषत्व, आरोग्य व हिंसेच्या मुद्द्यांवर पुरुषांसाठी कार्यशाळा-संवादसत्रं आयोजित करून, अनुभवी समुपदेशकांद्वारे गरजू

**टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत समाजकार्याचे पदव्युत्तर शिक्षण घेत असताना एका नामांकित स्त्रीसंघटनेत स्वयंसेवक म्हणून मी काम करायचो. वैवाहिक कलहाचे प्रश्न सोडविण्यासाठी संपर्क साधणाऱ्या गरजू स्त्रियांना समुपदेशन करत असताना काही प्रकरणांमध्ये संबंधित हिंसक पुरुषाला संस्थेने बहिष्कृत करण्याच्या कृतीने मी अधिक अस्वस्थ झालो. पुरुषांसोबत नातेसंबंध, लैंगिकता, हिंसा यांविषयी ठोस काम न करता, त्यांना परिवर्तनाच्या प्रक्रियेपासून दूर ठेवून साचेबद्ध पुरुषी प्रतिमा अधिक ठळक करण्यात आपण हातभारच लावत असतो, हे मला स्वानुभवाने उमजू लागले.**

स्त्रीपुरुषांना हेल्पलाईनद्वारा वा प्रत्यक्ष भेटून मार्गदर्शन करीत, कौटुंबिक हिंसाचार – स्त्रीलिंगी गर्भपात – लैंगिकता शिक्षण इ. विषयांवर व्यापक जनजागृतीपर मोहिमा घेत, 'पुरुषस्पंदनं – माणूसपणाच्या वाटेवरची' या वैशिष्ट्यपूर्ण दिवाळी अंकाद्वारे तमाम पुरुषांना अवकाश देऊन 'मावा' संस्था स्त्रीसक्षमीकरणासाठी पुरुषांची एक चळवळ उभी करत आहे.

एकमेकांच्या 'वाढी' व स्वास्थाकरिता अवकाश निर्माण करून, जिथे स्त्री आणि पुरुष परस्परआदराने व शांततामय सहअस्तित्वाच्या दिशेने एकत्र राहतील अशा सशक्त समाजनिर्मितीसाठी माझी व माझ्या तरुण साथीदारांची धडपड सुरू आहे. या सर्व प्रक्रियेत स्त्रीवादी व इतर चळवळीत अनेक वर्षे सक्रिय असलेले डॉ. रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ, राजीव कालेलकर व संजीव चांदोरकर या 'मावा'च्या खंद्या कार्यकर्त्यांची साथ तर आहेच. गेली चार वर्षे प्रतिबंधात्मक पातळीवर महाविद्यालयीन, ग्रामीण–शहरी युवकांसोबत राबविलेल्या उपक्रमास अजीम ऊर्फ राजू इनामदार, मिलिंद चव्हाण, प्रशांत केळकर या तडफदार संघटकांनी संवादक घडवण्यात घेतलेले अथक श्रमही आहेत. ज्येष्ठ लैंगिकतातज्ज्ञ डॉ. अनंत – शांता साठे, डॉ. विठ्ठल प्रभू यांच्याकडून वेळोवेळी मिळालेले प्रोत्साहन व आशीर्वादही आहेत. 'मावा'चे वेगळेपण टिकून आहे ते संस्था स्थापनेपासून आजतागायत संस्थेच्या स्त्रीकार्यकर्त्या व स्त्रीसंघटनांशी असलेल्या सुहृद नात्यांमुळे. संस्थेच्या कार्याला दिशा देण्यात कालिंदी मुझुमदार, मनीषा गुप्ते, प्रतिमा जोशी, छाया दातार, विद्या बाळ, ऊर्मिला पवार व आशा दामले यांसारख्या अनुभवी, कसलेल्या स्त्रीवादी विदुषींची तर मोलाची साथ आहेच; प्रसंगी 'चाकोरी मोडून काढणाऱ्या पुरुषांना एकाकीपणे कराव्या लागणाऱ्या लढ्याबद्दल संवेदनशीलतेने लिहिणाऱ्या कल्पना शर्मा व मणिमालासारख्या लढाऊ पत्रकारांनी दिलेलं बळ व उमेद शब्दांत व्यक्त करण्यापलीकडच्या आहेत.

आजच्या सामाजिक जीवनाकडे नजर टाकली तर बदलती जीवनशैली, ग्राहकवाद (मग यात स्त्रियांप्रमाणे पुरुषांचेही होणारे वस्तुकरण), धार्मिक मूलतत्त्ववाद या सर्वांचा परिणाम स्त्रीपुरुष नातेसंबंधावर होताना दिसत आहे. स्त्रिया अधिकाधिक आपल्या हक्कांविषयी सजग व आग्रही होत असताना पुरुष अधिक असुरक्षित, आक्रमक होत असल्याचेही दिसून येतेय. दोन वर्षांपूर्वी देशातील २९ राज्यांत केलेल्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणात ५४ टक्के स्त्रियांनी, घरातील पुरुषांकडून होणाऱ्या मारहाणीत काही गैर नाही असं मांडल्याचं दिसून आलं. तर ५१ टक्के पुरुषांनी, स्त्रियांना मारण्याचा आपल्याला हक्कच आहे असं सर्वेक्षणात सांगितलं. कलह सोडवण्यासाठी बहुसंख्य स्त्री–पुरुषांना शांततामय मार्गांचा अवलंब न करता सामाजिक हिंसा अपरिहार्य म्हणून स्वीकारावीशी वाटते हे एका रोगट समाजाचं निदर्शकच मानायला हवं.

हे शल्य मनाला टोचत असताना अजून एका शल्याबद्दल इथं मांडणं जरुरीचं वाटतं. महाराष्ट्रात आज सामाजिक विकासाच्या प्रश्नांवर तळमळीने, प्रामाणिकपणे काम करणारे लाखो कार्यकर्ते आहेत. प्रतिकूल वातावरणातही सतत नवनवीन प्रयोग करून आपण उचललेल्या मुद्द्यांवर ते संवेदनशीलपणे व सर्जनशीलतेने अनुरूप पर्याय निर्माण करत आहेत. मात्र, आपण झोकून काम करीत असलेल्या मुद्द्याचं, आपल्या चळवळीचा दुसऱ्या संबंधित मुद्द्यांशी, चळवळींशी काही नातं आहे का, सर्वच पातळ्यांवरील विषमता नष्ट करू इच्छिणारे सर्व संबंधित समाजाकारणात एकत्र का येत नाहीत, कप्पेबंद पद्धतीने (ghettoization) ने काम करून दुर्बल होऊन प्रस्थापित व्यवस्था टिकवून ठेवण्यात आपण हातभारच लावीत असतो, याविषयी आपण अंतर्मुख होऊन संघटित प्रयत्न करणार आहोत का? आज अंधश्रद्धा निर्मूलनावर काम करणाऱ्या कार्यकर्त्याला स्त्रियांना अंगात येणं व भानामतीसारखे प्रकार कसे अविवेकी आहेत हे चांगल्या पद्धतीने सांगता येते. पण या सर्व गोष्टींचा स्त्रीच्या दुय्यमत्वाशी संबंध आहे व ते दुय्यमत्व दूर करण्यासाठी स्त्रियांइतकाच पुरुषांशी (एक घटक म्हणून) संवाद साधायला हवा, हा विचार वा त्यासाठीचा कृतिकार्यक्रम त्याच्याजवळ नाही. खैरलांजी येथे स्त्रियांवर घडलेला अमानुष अत्याचार हा जातीयतेचा मुद्दा मानून राज्यातील अनेक स्त्रीसंघटनांनी उशीरा प्रतिक्रिया दिली, याचे दुःख फार थोड्यांना वाटते. कुमारवयीन मुलांना लैंगिकता–शिक्षण देण्याचं महत्त्व जाणून आज राज्यात नाविन्यपूर्ण पद्धतीने हे शिक्षण देण्यासाठी अनेक कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. पण दीड वर्षापूर्वी राज्य शासनाने शालेय मुलांना लैंगिक शिक्षण देण्याविषयी समिती नेमून अजूनही लैंगिक शिक्षण देण्याविषयीचा अभ्यासक्रम–आराखडा वा कुठलेच ठोस पाऊल उचललेले दिसत नाही, याची खंत किती कार्यकर्त्यांना आहे?

शेवटी एवढंच म्हणावसं वाटतं की 'सावित्रीच्या लेकी' निर्माण करण्याबाबत सजग असलेल्या पुरोगामी महाराष्ट्रात 'जोतिबाची लेकरं' निपजण्यासाठी आपापल्या पातळीवर सर्व संवेदनशील स्त्रीपुरुष काही पावलं उचलणार आहेत की नाही? 'जोतिबा–सावित्री' यांना अभिप्रेत असलेल्या सशक्त समाजनिर्मितीसाठी आपणांस एवढं करावंच लागेल.

**हरीश सदानी**
७०५, परिश्रम बिल्डिंग, ७ वा मजला,
भंडार गल्ली, लेडी जमशेदजी रोड, माहीम, मुंबई १६.
Mob. 9870307748
harsh267@rediffmail.com

ओळख ।

रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ

# संक्रमणकाळात जिद्दीने काम करणाऱ्या पिढीचा प्रतिनिधी

हरीश सदानी हा एकंदरीत ठोकताळ्यात न बसणारा माणूस आहे. जन्माने सिंधी, पण पैसे कमविण्याच्या बाबतीत मराठी माणसाइतकाच मठ्ठ. सामाजिक कार्यकर्ता, पण बोलण्या वागण्यात अजिबात आक्रमकता नाही. त्याला सामाजिक चळवळीचा वारसा लाभलेला नाही, पण मल्टीनॅशनलमधली आरामशीर नोकरी सोडून पूर्णवेळ कार्यकर्त्याचे बेभरवशाचे आयुष्य जगण्याचा 'मॅडनेस' त्याच्यामध्ये भरपूर आहे. 'टी.आय.एस.एस.'च्या ब्रँडचा शिक्का आहे त्याच्या 'सी.व्ही.'वर, पण यशस्वी 'करियर' करण्याची ईर्ष्याच दिसत नाही त्याच्या व्यक्तिमत्त्वात.

एकंदर 'दबंग' व्यक्तिमत्व नसलेल्या पुरुषाला जीवनाच्या कुठल्याही क्षेत्रात-पोलीसात, राजकारणात किंवा सामाजिक क्षेत्रात-यश मिळणे कठीणच. साहजिकच, इतर असंख्य गुण असणाऱ्या हरीशला अगदी आत्ताआत्तापर्यंत यश हुलकावणी देत होते. गेल्या एक-दोन वर्षात त्याला यशाची चव चाखायला मिळाली. पॉप्युलेशन कौन्सिलच्या पाठ्यवृत्तीपाठोपाठ 'अशोका चेंजमेकर्स'चा जागतिक बहुमान मिळाला. 'महाराष्ट्र फाउंडेशन'च्या पुरस्काराने तर त्यावर कळसच चढवला. आजच्या काळात अभावानेच सापडणाऱ्या (जुन्या सर्वोदयी-समाजवादी मुशीतल्या) सालस, निरलस, निष्ठावान, कष्टाळू, मुंगी-मधमाशी वर्गातील कार्यकर्त्यांचा ह्या पुरस्काराने यथोचित सन्मान झाला आहे, असेच म्हणावे लागेल.

हरीशची ओळख तशी सर्वत्र आहे. साऱ्याच प्रश्नांवर एकाच वेळी काम करण्याचा ट्रेंड होता, तेव्हापासून तो 'पुरुषांची जाणीवजागृती' ह्या एकाच प्रश्नावर सातत्याने काम करतो आहे. 'मावा'चा कार्यकर्ता, पीआरओ, फंड कलेक्टर, स्वयंसेवक, सीईओ, प्रकाशनांचा संपादक-सारे काही हरीशच आहे. (ही गोष्ट हरीश व मावा - दोघांसाठी योग्य नाही, याची आम्हाला जाणीव आहे. पण गेली काही वर्षे ही कोंडी आम्ही फोडू शकलो नाही, हे वास्तव आहे.) 'मावा'चे काम पुणे-सातारा-कोल्हापूर येथील ग्रामीण महाविद्यालयांपासून दिल्लीत भालचंद्र मुणगेकरांपर्यंत व मुंबईतल्या वस्त्यांपासून ऑस्ट्रेलिया-अमेरिकेतल्या स्त्रीवादी पुरुष गटांपर्यंत पोहचविण्याचे कामही हरीशनेच केले आहे.

त्याच्या संथ लयीत एक झपाटलेपण आहे व त्याच्या सौम्य, अनाग्रही व्यक्तिमत्वात ठामपणाही आहे. हरीशने एखादी गोष्ट ठरवली तर त्यापासून त्याला परावृत्त करणे महाकठीण. ऐंशीनंतरच्या पिढीतला कार्यकर्ता असल्यामुळे व चळवळीची पार्श्वभूमी नसल्यामुळे राजकारण-समाजकारणाचे ताणेबाणे त्याला समजत नाहीत, शिवाय त्याला त्याची फारशी गरजही वाटत नाही. (हा आम्हा 'म्हाताऱ्या' कार्यकर्त्यांचा आक्षेप.) त्यामुळे एखादी कल्पना डोक्यात आली की, हरीशची अवस्था वारा भरलेल्या शिडासारखी होते. 'पोलिटिकल करेक्टनेस'सारख्या गोष्टी कानाआड करीत तो शंभर माणसांचा पाठपुरावा करीत ते काम पार पाडतो. अनेकदा आपल्या प्रामाणिकपणाची किंमतही त्यासाठी त्याला चुकवावी लागते.

ज्या 'मावा'शी हरीशची नाळ जुळली, तिची सुरुवातही आगळीवेगळीच आहे. २३ ऑक्टोबर १९९१ च्या 'इंडियन एक्स्प्रेस'मध्ये 'कुटुंबांतर्गत हिंसाचार' ह्या विषयावर क्लेअर तळवलकरांचा एक लेख प्रकाशित झाला. त्या लेखासोबत पत्रकार सामाजिक कार्यकर्त्यांच्या एका समूहाने एक छोटी जाहिरात छापली. तिचे शीर्षक होते. 'पाहिजेत : बायका या मारण्यासाठी नसतात, असा विश्वास असणारे पुरुष' ह्या जाहिरातीला १६ ते ७२ वयाच्या तब्बल २०५ पुरुषांनी प्रतिसाद दिला. दीड वर्ष हा ग्रुप भेटत राहिला व त्याच्या मंथनातून मार्च १९९३ मध्ये 'मेन अगेन्स्ट व्हायोलिन्स अँड ॲब्युज' (मावा) ह्या संस्थेची स्थापना झाली. गेल्या १७ वर्षात कितीतरी कार्यकर्ते आले आणि गेले, पण हरीश सातत्याने 'मावा'चे काम करतो आहे.

स्त्री-पुरुष समतेसाठी पुरुषांना बदलण्याचे काम अतिशय अवघड आहे. मुळात दबल्या-पिचल्या समाजघटकांना जागृत करणे ही सोपी बाब नाही; पण अशा घटकांमध्ये बंडखोरीचा निद्रिस्त स्फुल्लिंग मुळात असतोच. तो चेतवला, संघटित

केला की त्यातून परिवर्तनाकडे वाटचाल होऊ शकते. डॉ. आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे गुलामाला गुलामीची जाणीव करून दिली की त्याच्या मुक्तीची वाट तो स्वत: चालू शकतो. पायात चिणलेले दगड जेव्हा उफाळून वर येतात, तेव्हा ज्वालामुखीसारखी तीव्र उर्जा त्यांच्यासोबत असते. कामगार, दलित, स्त्रिया सर्वांच्या मुक्तीचा इतिहास आपल्याला हेच सांगतो. पण ह्या व्यवस्थेत जे सत्ताधारी, शोषक आहेत, त्यांना बदलणे अतिशय कठीण आहे. त्यातून स्त्री-पुरुष नाते हे डीएनएच्या दोन पदरांसारखे - कधी जवळ येणारे, पुन्हा दूर जाणारे आहे. एकमेकांशी घट्ट बांधले गेलेले तरीही 'पुरुषीपणा' आणि 'बायकीपणा' अशा दोन ध्रुवांवर त्यांना राहण्यास बाध्य करणारे, गुंतागुंतीचे असे हे नाते आहे. पुरुषसत्ता किंवा कोणतीही सत्ता, शोषितासोबत शोषकाचेही अवमूल्यन करते; त्याला माणूसपणापासून दूर नेते. ह्या सत्तेने निर्मिलेल्या नात्यांचे, प्रतिमांचे, व्यवस्थांचे तुरुंग फोडून स्वत:चे 'मी' पण, माणूसपण शोधणे व स्त्रियांशी समतेचे, सहृदयतेचे, निखळ प्रेमाचे नाते प्रस्थापित करणे हीच खरी पुरुषमुक्ती. हा संदेश पुरुषांना समजावून त्यांना बदलण्यासाठी प्रवृत्त करणे, ही बाब तशी खूपच अवघड आहे. कारण बदलण्यातून मिळणारे लाभ - उदा. निरामय नातेसंबंध, खोट्या अपेक्षा व तणावापासून मुक्ती- धूसर व भविष्यकालीन असतात. न बदलण्यापासून तात्कालिक लाभ आज मिळत असतात. मुख्य म्हणजे सर्वसामान्य पुरुष हजारो वर्षांच्या रुढी, संस्कार व आजच्या माध्यमांमधून साकारल्या जाणाऱ्या प्रतिमा यांच्याविरुद्ध बंड करण्यासाठी आवश्यक प्रेरणा व ऊर्जा कोठून आणणार? त्यामुळे पुरुषांमधल्या बदलाची प्रक्रिया ही संथ, कष्टसाध्य असणार आहे. तिला चळवळीचे स्वरुप येण्यास खूप अवधी लागेल.

हरीश हे कष्टाचे, ग्लॅमरहीन काम सातत्याने, चिकाटीने करतो आहे. पुरुषत्वाची वीण ही जात, वर्ग, शिक्षण, सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण अशा अनेक ताण्या-बाण्यातून साकार होत असते याचे हरीशला भान आहे. हे भान त्याच्या स्वत:च्या अनुभवातून आले आहे व ते त्याने अभ्यासातून, निरीक्षणातूनही कमावले आहे. म्हणूनच त्याला विविध समाजघटकांसोबत काम करण्याची निकड वाटते. खरे तर गेल्या दोन-तीन वर्षात आंतरराष्ट्रीय संस्था व फंडिंग एजन्सीजच्या आग्रहामुळे 'पुरुषांमध्ये जाणीवजागृती' ही बाब अचानक सर्व स्वयंसेवी संस्थांच्या अजेंड्यावर आली आहे. आपला दीर्घ अनुभव, टाटा इन्स्टिट्यूटची पदवी व परिभाषेचा वापर ह्या पुंजीचा वापर करून एक तज्ज्ञ म्हणून आपली प्रतिमा तयार करणे व त्यानंतर मुंबई-दिल्ली-न्यूयॉर्क जीनिव्हा ह्या सर्कीटमध्ये सेमिनार्समध्ये भ्रमण करणे ही बाब हरीशला शक्य होती. पंधरा वर्षे पूर्णवेळ कार्यकर्त्याचे खडतर आयुष्य जगल्यावर ती समर्थनीयही ठरली असती. पण त्याने त्याऐवजी मुंबईपासून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाकडे जाण्याचे ठरविले. पुण्याच्या ग्रामीण भागातील कॉलेजविद्यार्थ्यांमध्ये केलेल्या कामाने त्याला नवीन हुरुप व गणेश फुलेसारखे तळमळीचे सहकारी मिळाले. आज सातारा-सोलापूर, जळगावमध्ये नवे काम उभारण्याच्या कामात तो मग्न आहे. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांविरुद्ध केवळ आवाज उठविणे महत्त्वाचे नाही, तर त्याला प्रतिबंध करणे आवश्यक आहे व त्यासाठी महाविद्यालयीन युवकांशी सातत्याने संवाद करायला हवा. राष्ट्रीय सेवा योजना, स्त्री अत्याचार विरोधी कक्ष यांच्या माध्यमातून असे काम सातत्याने करता येईल यासाठी हरीश अनेक विद्यापीठांशी बोलतो आहे. एकूण येत्या अनेक वर्षांचा त्याचा अजेंडा 'फुल्ल' आहे.

हरीशचे वैशिष्ट्य हे की ह्या कामात त्याने प्रचंड विविधता आणली आहे. कितीतरी माध्यमांचा वापर त्यासाठी केला आहे. निव्वळ 'पुरुष स्पंदनं'च्या अंकात आलेल्या साहित्याचा परामर्श घेतला तरी त्यातून ह्या विषयाचे कितीतरी कंगोरे (उदा. पुरुषांची मानसिकता घडविण्यात जात, धर्म, वर्ग, माध्यमे यांची भूमिका, लैंगिकता, स्त्री-पुरुष मैत्री) स्पष्ट होतात. समलिंगी संबंध हा शब्द मराठी समाजात सार्वजनिकरित्या उच्चारला जात नव्हता, त्या काळात 'पुरुष स्पंदनं'ने चेतन दातारची ह्या विषयावरील एकांकिका प्रकाशित केली होती हे लक्षणीय आहे. जाणीव-जागृतीसाठी शिबिरे, परिसंवाद, चित्रप्रदर्शने, भित्तीफलक, प्रायोगिक नाटक, चित्रपटांचे प्रयोग, त्यावर चर्चा, सडकनाट्य, युवतींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण, खेळ, मोर्चे, पत्रकारपरिषदा, युवांसाठी

**हरीश हे कष्टाचे, ग्लॅमरहीन काम सातत्याने, चिकाटीने करतो आहे. पुरुषत्वाची वीण ही जात, वर्ग, शिक्षण, सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण अशा अनेक ताण्या-बाण्यातून साकार होत असते याचे हरीशला भान आहे. हे भान त्याच्या स्वत:च्या अनुभवातून आले आहे व ते त्याने अभ्यासातून, निरीक्षणातूनही कमावले आहे. म्हणूनच त्याला विविध समाजघटकांसोबत काम करण्याची निकड वाटते.**

टेलिफोन हेल्पलाईन अशी कितीतरी माध्यमे 'मावा'ने, पर्यायाने हरीशने वापरली आहेत. स्त्री-संस्थांसोबत वैवाहिक प्रश्नांवर समुपदेशाचे काम सुरू आहे. मुंबई मॅरेथॉनमधील नामवंतांच्या सहभागातून व प्रख्यात चित्रकारांच्या चित्रांच्या लिलावातून 'मावा'ला आर्थिक मदत व मानसिक पाठिंबा मिळवून देण्यासारखे अभिनव उपक्रम त्याने राबविले आहेत.

समाजकार्याच्या संकल्पना, इतर सर्व संकल्पनांप्रमाणे झपाट्याने बदलत आहेत. आणीबाणीच्या आसपास सक्रीय झालेली पिढी (देशातील राजकारणात सक्रिय असली) तरी महाराष्ट्रातील समाजकारणातून निवृत्त होण्याच्या मार्गावर आहे. गांधीवाद-मार्क्सवाद-समाजवादावर पोसलेल्या ह्या पिढीने लोकविज्ञान, अंधश्रद्धानिर्मूलन, स्त्रीप्रश्न, पर्यावरण, आरोग्य अशा अनेक प्रश्नांवर चळवळी उभारल्या व रेट्याने चालविल्या. आता त्या सर्व अस्तंगत होण्याच्या मार्गावर आहेत. संस्था-संघटनांची जुनी मॉडेल्स कालबाह्य झाली आहेत. स्वयंसेवी संघटना कॉर्पोरेटच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. उद्या त्यांच्यातही merger व take over चा trend आला तर आश्चर्य वाटू नये. दुसरीकडे समाजातला गुंता वाढतो आहे. सामान्यांचे प्रश्न बिकट होत आहेत. पण लढण्याची ईर्ष्या लोप पावते आहे. भविष्यातले लढे कसे असतील, त्यांची आयुधे, रणनीती काय असेल कुणी सांगू शकत नाही.

पण दरम्यानच्या काळातही काही लोकांना चिकाटीने प्रबोधनाचे काम करावेच लागेल. समाजाची मनोभूमी नांगरावी लागेल. त्यासाठी मागच्या पिढीची चिकाटी व आशावाद ह्यांची सांगड नव्या युगातले तंत्रज्ञान व नवे मार्ग यांच्याशी घालावी लागेल. उद्याच्या क्रांतीचे पाईक कोण असतील, माहीत नाही. पण संक्रमणकाळात जिद्दीने काम करणाऱ्या पिढीचा हरीश हा प्रतिनिधी आहे. त्याच्या कामाचे मोल वेळीच ओळखून त्याला प्रोत्साहित केल्याबद्दल महाराष्ट्र फाउंडेशनचे अभिनंदन! हरीश व 'मावा' त्यातून ऊर्जा घेऊन, कात टाकून नव्या उत्साहाने कामाला लागतील अशी अपेक्षा करू या.

**रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ**
एनएमआयएमएस परिसर, तापीकाठ,
बाभुळदे, शिरपूर (धुळे) ४२५४०५.
Mob. 9764642434